# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./आयसीसी/२०१८–१९/०२
दिनांक — २९ मे, २०१८

परिपत्रक :—

सर्व प्राचार्य/संचालक/संलग्नित व स्वायत्त अशासकीय/शासकीय व तत्सम महाविद्यालये व संस्था, सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालय, तसेच सर्व विद्यापीठ विभाग प्रमुख, प्राध्यापक–नि–संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था व विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव यांना कळविण्यात येते की, शासन परिपत्रक क्र. सीबीसी–१२/२००८/प्र.क्र.४२७/मावक–५ दिनांक ३१ जुलै, २००८ नुसार शासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त विनाअनुदानित व कायम विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा–या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्गमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपुर्तीसाठी जाती वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत आदेश निर्गमित केलेले आहेत.

परंतु, उपरोक्त शासन निर्णयामध्ये स्पष्ट मार्गदर्शन विहित केलेले असतानाही विधी महाविद्यालयाचे काही प्राचार्य वैधता प्रमाणपत्राची सक्ती करत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

उपायुक्त, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, ठाणे यांनी पत्र क्र. जा.क्र./जि.जा.प्र.प.ठाणे/२०१८/३१९२ दिनांक १९ मे, २०१८ अन्वये याबाबत मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून फी सवलत अथवा प्रवेशासाठी वैधता प्रमाणपत्राची मागणी करू नये अशा स्पष्ट सुचना दिल्या आहेत. (पत्र संलग्न)

वरिल शासन निर्णय व समितीचे दिनांक १९ मे, २०१८ चे पत्र विद्यापीठाच्या mu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सर्व विधी महाविद्यालयांचे प्राचार्यांनी याची अंमलबजावणी करावी.

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव (प्र)

माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी —

सर्व प्राचार्य/संचालक/संलग्नित व स्वायत्त अशासकीय/शासकीय व तत्सम महाविद्यालये व संस्था, सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालय, तसेच सर्व विद्यापीठ विभाग प्रमुख, प्राध्यापक–नि–संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था व विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव.

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव (प्र)

25/5/18

PAtoR

22 MAY 2018
4976

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

# जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, ठाणे.

तळमजला दालन. क्र.९ व १० कोंकणभवन, बेलापूर, नवी मुंबई.
फोन क्र. ०२२-२७५७०२२७ Email-thanecvc@gmail.com

जा.क्र./जि.जा.प्र.प.ठाणे/ / /२०१८. / ३७८२ दि. १९/०५/२०१८.

प्रति,
निबंधक,
मुंबई विद्यापीठ मुंबई-
फोर्ट, मुंबई

**विषयः-** **विधी महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यार्थांना अनावश्यक त्रास देत असलेबाबत.. ..**

**संदर्भः**-१) महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यवसायीक शैक्षणिक संस्था, (प्रवेश व शुल्क नियमन) अधिनियम २०१५ मधील अधिसुचना दिनांक ११ मार्च २०१६.

२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचा शासन निर्णय क्र.सीईटम-२०१६/प्र.क्र.८४/मशि-२ दि.०७/०४/२०१६.

३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे शासन परिपत्रक क्र.-सीबीसी-१२/२००८/प्र.क्र.४२७/मावक-५ दि.३१ जुलै, २००८.

संदर्भातील एक (दि.११/०३/२०१६) ची अधिसुचना अन्वये महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यवसाय शैक्षणिक संस्था, अधिनियम २०१५ च्या अनुषंगाने व्यवसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश देण्यासाठी, सामूहिक प्रवेश परीक्षा व अभ्यासक्रम निहाय पात्रता याबाबत मार्गदर्शक सुचना आहेत. सदर अधिसुचनेत विधी अभ्यासक्रमात प्रवेशासाठी जातवैधता प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याचे कोठेही नमुद केलेले नाही. तरी देखील विधी अभ्यासक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्याची सक्ती करत आहेत. ही गंभीर बाब आहे.

विधी अभ्यासक्रम प्रवेशासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. असे महाविद्यालयाच्या प्राचार्यांना, या समितीमार्फत लेखी कळविण्यात आले आहे. तरी देखील महाविद्यालय, वैधताप्रणपत्र सादर न केल्यास भारत सरकार शिष्यवृत्ती / शिक्षण फि परीक्षा (फ्री शीप) चा

लाभ मिळणार नाही, अशी चुकीची माहीती मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देऊन त्यांची दिशाभूल करीत आहेत.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी दिनांक ३१ जुलै २००८ च्या परिपत्राकान्वये ( संदर्भातील क्र.३ ) कोणत्या व्यवसायिक अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपुर्तीसाठी जातवैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे, याबाबत अभ्यासक्रमांची नांवे व स्पष्ट सुचना दिलेल्या आहेत. या परिपत्राकातील अभ्यासक्रमामध्ये विधी अभ्यास क्रमांचा समावेश नाही, म्हणजेच विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क सवलतीसाठी (शिष्यवृत्ती / शिक्षण फी परीक्षा) वैधता प्रमाणपत्राची अट नाही, असे असताना प्राचार्य मागासवर्गीय विद्यार्थ्यांना चुकीच्या बाबी सांगुन मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या मनात भिती निर्माण करीत आहेत, ही अत्यंत गंभीर बाब आहे व यावर तातडीने विद्यापीठामार्फत स्पष्ट सुचना सर्व विधी महाविद्यालयाना निर्गमित होणे आवश्यक आहे.

संदर्भातील १ व ३ च्या प्रती सोबत जोडल्या आहेत. तेव्हा आपल्या स्तरावरुन "कोणत्याही मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडुन फी सवलत अथवा प्रवेशासाठी वैधता प्रमाणपत्राची मागणी करुन नये" अशा स्पष्ट सुचना विधी महाविद्यालयांना लेखी स्वरुपात देण्यात याव्यात, अशी समितीमार्फत विनंती करण्यात येत आहे.

उपायुक्त,
जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी
समिती, ठाणे.

प्रत:-

१) **मा.महासंचालक,** डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी, पुणे.

शासकीय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त विनाअनुदानित व कायम विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गांमधील विदयार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या <u>प्रतिपूर्तीसाठी जाती वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत</u>

**महाराष्ट्र शासन**

शासन परिपत्रक क्रमांक:- सीबीसी-१२/२००८/प्र.क्र. ४२७ /मावक-५
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय ,विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ३१ जुलै,२००८

वाचा :- १) शासन निर्णय,विमुक्त जाती, भटक्या जमाती ,इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग ,क्रमांक :-सीबीसी-१२/२०००/२५२ /प्र.क्र.१/मावक-५, दिनांक २५ जानेवारी, २०००

२) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग . क्रमांक :-इमाव -२००७/प्र.क्र.१५०/मावक-३ , दिनांक १७ जुलै, २००८

३) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग क्रमांक :-इबीसी -२००८/प्र.क्र.१३८/मावक-२ , दिनांक १७ जुलै, २००८

<u>प्रस्तावना</u> :-संदर्भ क्रमांक १ वरील या विभागाच्या शासन निर्णय दिनांक २५.जानेवारी,२००० नुसार वैद्यकीय, अभियांत्रिकी , वास्तुशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अनुसूचित जाती , विमुक्त जाती, भटक्या जमाती , इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गांमधील जे विदयार्थी इयत्ता ११ वी सायन्स शिकत असतील अशा विदयार्थ्यांची जाती दावा पडताळणीचे प्रस्ताव त्यांच्या संस्थे मार्फत पडताळणी समितीकडे पाठविण्याबाबत विहित कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. संदर्भ क्रमांक २ व ३ येथील शासन निर्णयानुसार त्यामध्ये नमूद व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता तसेच मागासवर्गीय विदयार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीसाठी जाती वैधता प्रमाणपत्राची अट घालण्यात आली आहे. असे जाती दावा पडताळणीचे प्रस्ताव संबंधित शैक्षणिक संस्थेमार्फत विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर करण्या संदर्भात कार्यपध्दती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन परिपत्रक</u> :- राज्यातील शासनमान्यताप्राप्त शासकीय, अनुदानित,खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसुचित जाती , विमुक्त जाती, भटक्या जमाती , इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गातील खालील व्यावसायिक अभ्यासक्रमांना (बी. एड. व डी. एड. कोर्स वगळून ) प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गीय विदयार्थ्यांच्या जाती दाव्यांची पडताळणीचे प्रस्ताव संबंधित शैक्षणिक संस्थेने त्यांच्या कार्यक्षेत्रातील विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कडे पाठवावीत

अ) आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी, आयुर्वेद ,भौतिकोपचार, व्यवसायोपचार व नर्सिंग )

ब) उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत असणारे

| पदविका | पदवी | पदव्युत्तर पदवी |
|---|---|---|
| अभियांत्रिकी | अभियांत्रिकी | एम.बी. ए. |
| औषधनिर्माण शास्त्र | औषधनिर्माण शास्त्र | एम.सी.ए. |
| एच.एम.सी.टी | एच.एम.सी.टी | |
| | आर्कीटेक्चर | |

क) कृषी , पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच बी.एस.सी. (जैव तंत्रज्ञान)

ड) इ. १० वी ची शालांत परिक्षा ( S.S.C. / C.B.S.E व तत्सम ) उत्तीर्ण होऊन महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या पूर्णवेळ अभ्यासक्रमात शिकणारे विद्यार्थी.

इ) "वास्तुशास्त्र" या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या ज्या विदयार्थ्यांनी इयत्ता १२ वी शिकत असताना ते शास्त्र अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अन्य अभ्यासक्रमातील असल्यामुळे उदा. वाणीज्य इत्यादी, जाती वैधता प्रमाणपत्र प्राप्त करु न शकलेले विद्यार्थी

२. वरील अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या अनुसूचित जाती , विमुक्त जाती, भटक्या जमाती , इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गातील विदयार्थ्यांना जाती वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची अट लागू करण्यात येत आहे. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग , उच्च व तंत्रशिक्षण विभाग व कृषि व प.दु.म. विभागामार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील वरील अभ्यासक्रमासाठी मागासवर्गीय विदयार्थ्यांच्या प्रवेशाबाबत जाती वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासंदर्भात प्रचलित असलेले निर्देश / सूचना लागू राहतील.

३. संबंधित विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणीचे प्रस्ताव संबंधित शैक्षणिक संस्थेमार्फत , संस्थेच्या कार्यक्षेत्रात असणा-या विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे खालील कार्यपध्दतीनुसार सादर करणे अनिवार्य राहील.

अ) वरील अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यांनी संबंधित शैक्षणिक संस्थेकडे प्रवेश घेतल्यापासून १ महिन्याच्या आत आवश्यक त्या कागदपत्रांसह परीपूर्ण प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील. त्याबाबत शैक्षणिक संस्थेने विद्यार्थ्यांना सुचना दयाव्यात व सुचनांना व्यापक प्रसिध्दी द्यावी.

ब) वरील "अ" प्रमाणे संस्थेकडे प्राप्त झालेले प्रस्ताव,संस्थेने ते प्राप्त झाल्यापासून ८ दिवसाच्या आत संबंधित जिल्हयाच्या विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचेकडे पाठवावेत.

क) वरील "ब" प्रमाणे प्राप्त झालेले प्रस्ताव विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी संबंधित विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे जसे प्राप्त होतील तसे तत्परतेने वेळच्या वेळी पाठवावेत.

ड) जाती प्रमाणपत्र समितीकडे प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव समितीने ३ महिन्याच्या आत निकाली काढावेत.

४. विद्यार्थ्यांच्या जाती दावा पडताळणीच्या प्रस्तावाबाबत वर दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्याबाबत शैक्षणिक संस्थांना आवश्यक त्या सूचना देण्यासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग व कृषी व प.दु.म. विभाग यांनी योग्य ती कार्यवाही करावी. जाती वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती करण्यात येऊ नये.

५. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आला असून, त्याचा संगणक क्रमांक :- २००८०७३१२६१२३४०९१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

( एन. आरुमुगम )
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,
प्रधान सचिव,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
आयुक्त, विमुक्त जाती भटक्या जमाती व इतर मागासवर्ग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी
सदस्य सचिव तथा संशोधन अधिकारी, सर्व विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, २ व ३,
यांचे कार्यालय, नवी मुंबई,कोकण भवन, रत्नागिरी, मुंबई उपनगर जिल्हा (वरळी), पुणे, कोल्हापूर, नाशिक, धुळे, औरंगाबाद, लातूर, नागपूर, चंद्रपूर, अमरावती, अकोला.
विभागीय समाजकल्याण अधिकारी (जात प्रमाणपत्र पडताळणी) सर्व विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, २ व ३,
यांचे कार्यालय, नवी मुंबई,कोकण भवन, रत्नागिरी, मुंबई उपनगर जिल्हा (वरळी), पुणे, कोल्हापूर, नाशिक, धुळे, औरंगाबाद, लातूर, नागपूर, चंद्रपूर, अमरावती, अकोला.
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, गट-अ
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
समाजकल्याण अधिकारी, बृहन्मुंबई, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग.
निवड नस्ती - कक्ष-५